पुढारी - 15/7/19

# सलग बाराव्या रविवारी पाच डंपर कचरा जमा

## सेवाभावी संस्थांनी महास्वच्छता अभियानात सहभागी व्हावे : डॉ. कलशेट्टी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापूर शहरामध्ये सलग बाराव्या रविवारी महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. सकाळी सात वाजल्यापासून सुरू झालेल्या या अभियानामध्ये सेवाभावी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, शहाजी कॉलेज व कमला कॉलेजच्या एन. सी. सी. व एन. एस. एस. चे विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक, शिक्षिका व विविध संघटनांनी सहभाग नोंदवून या अभियानास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी ५ डंपर कचरा गोळा करण्यात आला.

या मोहिमेकरिता आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली उपआयुक्त मंगेश शिंदे, शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत, जलअभियंता सुरेश कुलकर्णी यांनी नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहिले. सकाळी संप व पंप हाऊस येथे स्वच्छतेची शपथ घेऊन आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या हस्ते या स्वच्छता मोहिमेस प्रारंभ करण्यात आला.



**कोल्हापूर : महापालिका स्वच्छता अभियानात सेवाभावी संस्थांच्या कार्यकर्त्यांसह विद्यार्थ्यांनीही सहभाग नोंदविला. (छाया : नाज ट्रेनर)**

यावेळी शहाजी कॉलेजचे एन.सी.सी. व एन.एस.एस. च्या विद्यार्थी, विद्यार्थिनींनी या मोहिमेत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून या परिसराची व कॉलेज कॅम्पस परिसराची स्वच्छता करून वृक्षारोपण करण्यात आले. तसेच राजारामपुरी येथे कमला कॉलेजच्या एन.सी.सी. व एन.एस. एस. च्या विद्यार्थिनींनी राजारामपुरी परिसराची व कॉलेज कॅम्पस परिसराची स्वच्छता करून वृक्षारोपण करण्यात आले. महापालिकेच्या वतीने विल्सन ब्रिज लक्ष्मीपुरी, सावित्रीबाई फुले हॉस्पिटल मागील बाजूस ते रिलायन्स मॉल पिछाडीस, सिद्धीविनायक गणपती मंदिर पुलाची खालची बाजू, लक्ष्मीपुरी ते आयर्विन ब्रिज, टायटन शोरूम लगत दफनभूमी, आयर्विन ब्रिज ते पंप हाऊस, संप आणि पंप हाऊस ते सिद्धार्थनगर या जयंती नाल्याच्या परिसराची व रंकाळा तलाव पूर्व व पश्चिम बाजूची स्वच्छता करून वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी सलगर यांनी मोहिमेतील उपस्थित विद्यार्थी, विद्यार्थिनींना मोफत चहा दिला. यावेळी उपआयुक्त मंगेश शिंदे, सहा.आयुक्त संजय सरनाईक, यशवंतराव चव्हाण कॉलेज प्राचार्य डॉ. सुरेश गवळी, उपशहर अभियंता हर्षजित घाटगे, नारायण भोसले, आर. के. पाटील, शहाजी कॉलेजचे प्राचार्य आर. के. शानेदिवान, कमला कॉलेजच्या प्र. प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर, अनिल घस्टे, डॉ. सुजय पाटील, प्रा. रेखा पंडित, वर्षा साठे, रोटरी क्लबचे गिरीष जोशी, अश्विनी जोशी, नितीन शिंदे, दिलीप देसाई, उदय गायकवाड कर्मचारी, अधिकारी, स्वयंसंस्थेचे कार्यकर्ते व नागरिक यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.